CNR NO. MHSO07-000065-2019

<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ५५/२०१९ मधील निशाणी क्रमांक २६ वरील आदेश</u>

**(चित्रा विरुध्द बजरंग)**

**१.** वादीने प्रस्तुत दाव्यात कागदपत्रे दाखल करण्याकरिता प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे.

**२.** प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी क्र.१ चे अधिवक्त्याने म्हणणे देवुन सदर कागदपत्रे ही वादीने संबंधीत कारखान्याशी संगनमत करुन दावा दाखल केल्यानंतर तयार केली असल्यामुळे त्यास निशाणी देवुन पुराव्यात वाचण्यास हरकत घेतली आहे.

**३.** निशाणी क्र.२६ वरील प्रस्तुत अर्ज व त्यावरील प्रतिवादी क्र.१ चे अधिवक्त्याने दिलेले उत्तर वाचले. वादी व प्रतिवादी क्र.१ च्या विव्दान अधिवक्त्यांचा युक्तिवाद ऐकला.

**४.** वादीने प्रस्तुत दावा निरंतर ताकीद मिळणेकरिता प्रतिवादींविरुध्द दाखल केलेला आहे. वादीने तिचे नावे विठ्ठल सहकारी साखर कारखाना लि. वेणुनगर, गुरसाळे येथे ऊस नोंदीबाबतचा दाखला, सदर कारखान्यास वादीचे नावे नोंद दिलेबाबतची पोहचपावती, वादीने प्रतिवादीविरुध्द पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनला फिर्याद दिली त्याची स्थळप्रत आणि सदर फिर्याद दिल्याबाबतची पोष्टाची पोहोच पावती दाखल केलेली आहे. सदर कागदपत्रे ही प्रस्तुत दाव्याचा व निशाणी क्र.५ वरील तात्पुरत्या मनाई हुकूमाच्या अर्जाचा गुणागुणांवर निकाल होण्याकरिता अभिलेखावर दाखल करणे आवश्यक असल्याने दाखल करण्यास परवानगी देणे न्यायोचित वाटते. सबब, प्रस्तुत अर्ज निकाली काढण्याकरिता खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१) वादीस प्रस्तावित कागदपत्रे अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी मंजुर करण्यात येते.

२) प्रस्तुत अर्ज येणेप्रमाणे निकाली काढण्यात येतो.

दिनांकः– ०८.०२.२०२१.

(प्र.प्र. देशमुख)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर पंढरपुर

CNR NO. MHSO07-000065-2019

***CERTIFICATE***

*I affirm that, the contents of this PDF file order are same word to word, as per the original order.*

| | | |
|---|---|---|
| *Name of Stenographer* | *:* | *A.K. Vibhute* |
| *Court* | *:* | *Jt. Civil Judge, Junior Divison, Pandharpur* |
| *Date* | *:* | *08.02.2021.* |
| *Order signed by the Presiding Officer on* | *:* | *08.02.2021.* |
| *Order uploaded on* | *:* | *09.02.2021.* |